आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१० जून २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालचं सरकार गतीशील आणि निर्णयक्षम सरकार असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाला वैधानिक दर्जा देण्यासंबंधीचं विधेयक विधिमंडळाच्या आगामी अधिवेशनात मांडलं जाणार

- नव्या चेहऱ्यांना संधी देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची पदाचा राजीनामा देण्याची तयारी

**आणि**

- भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी आयसीसीच्या हॉल ऑफ फेम मधे विराजमान

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालचं सरकार गतीशील आणि निर्णयक्षम सरकार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते मुंबई इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. मोदी सरकारने देशातला भ्रष्टाचार संपवत विकास आणि सर्वसमावेशकतेच्या आधारे सरकार चालवलं असं मुख्यमंत्री म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात सुरू असलेल्या विकासकामांचा उल्लेख मुख्यमंत्र्यांनी यावेळी केला. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारने एका वर्षात ३० लाख घरं देण्याचा विक्रम केला, ८१ कोटी लोकांना मोफत अन्नधान्य, १५ कोटी घरांना नळजोडणी, १२ कोटी घरांमधे शौचालय दिलं असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ११ वर्षात देशाच्या संरक्षण खात्याचा कायापालट झाला असल्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. मजबूत सीमा, अद्ययावत सेनादलं, देशातच तयार झालेली शस्त्रास्त्रं, संरक्षण उत्पादनांची विक्रमी निर्यात, जागतिक स्तरावर अधिक विश्वास, आणि आत्मनिर्भरतेकडे वाटचाल या शब्दांमधे राजनाथ सिंग यांनी संरक्षण क्षेत्राच्या गेल्या ११ वर्षातल्या वाटचालीचं वर्णन केलं आहे. गेल्या ११ वर्षांत देशाच्या संरक्षण क्षेत्रात लक्षणीय बदल झाल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. देशानं आधुनिकीकरण आणि संरक्षण उत्पादनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यावर लक्ष केंद्रित केलं आहे. देशाचे नागरीक आपल्या देशाला अधिक मजबूत बनवण्याचा संकल्प घेऊन एकत्र आल्याचं पाहून आनंद होत असल्याचं मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

ऑपरेशन सिंदूर बाबत जगभरातल्या महत्त्वाच्या देशांना भेटी देऊन भारताची भूमिका मांडणाऱ्या सर्वपक्षीय शिष्टमंडळांमधल्या सदस्यांची आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी भेट घेणार आहेत. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्या कार्यालयानं आज संध्याकाळी सात वाजता प्रधानमंत्र्यांच्या निवासस्थानी ही भेट होणार असल्याचं कळवलं आहे. दरम्यान, शशी थरुर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाचं आज मायदेशी आगमन होणार आहे.

**<><><><>**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाला वैधानिक दर्जा देण्यासंबंधी विधेयक आगामी विधिमंडळ अधिवेशनात आणण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. शासकीय भौतिकोपचार आणि व्यवसायोपचार पदवी विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात ६ हजार २५० रुपयांची वाढ, पदव्युत्तर पदवी विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात १० हजार रुपयांची वाढ, तसंच बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या

विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात ८ हजार रुपयांची  वाढ करण्याचा निर्णयही आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाला.

**<><><>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका भांडवली बाजारातून निधी देशातली पहिली महानगरपालिका ठरल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा हरित कर्जरोखे लिस्टिंग कार्यक्रम मुंबई इथं मुंबई शेअर बाजाराच्या सभागृहात आज झाला तेव्हा ते बोलत होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने जारी केलेल्या हरित कर्जरोख्यांना जनतेकडून चांगला प्रतिसाद मिळाला. कर्जरोखे जारी झाल्यानंतर काही मिनिटातच शंभर कोटींची गुंतवणूक झाली. यावरून हरित कर्जरोख्यांवरचा गुंतवणूकदारांचा विश्वास दिसतो, असं फडणवीस म्हणाले. केंद्र सरकारकडूनही २० कोटींचं प्रोत्साहनपर अनुदान महानगरपालिकेला मिळाल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह उपस्थित होते.

**<><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत वित्तीय स्थिरता आणि विकास परिषदेची २९ वी बैठक सुरु आहे. या बैठकीला केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी, भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा देखील उपस्थित आहेत.

**<><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा देण्याची तयारी दाखवली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी नव्या चेहऱ्यांना संधी द्यावी अशी विनंती त्यांनी केली. पुण्यात आयोजित

पक्षाच्या वर्धापन दिन कार्यक्रमात ते बोलत होते. सात वर्षांपासून ते प्रदेशाध्यक्ष आहेत. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर लक्ष केंद्रीत करा. राज्य चालवणारं नवीन नेतृत्व निर्माण करण्यासाठी काम करा असं आवाहन शरद पवार यांनी यावेळी उपस्थितांना केलं.

<><><><>

सातारा जिल्ह्यातल्या पाटण तालुक्यातले सत्यजितसिंह पाटणकर यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह आज भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. भाजपाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण तसंच मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत पाटणकर यांनी मुंबईत झालेल्या कार्यक्रमात भाजपात प्रवेश केला. सत्यजितसिंह पाटणकर हे सध्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात होते.

<><><><>

भारताचे अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांना अंतराळात घेऊन जाणारी ऑक्सियम-4 मोहिम शुभारंभ प्रतिकूल हवामानामुळे एका दिवस पुढे ढकलण्यात आली आहे. ही ऐतिहासिक मोहीम अमेरिका, भारत, पोलंड आणि हंगेरी या देशांच्या चार अंतराळवीरांना १४ दिवसांच्या वैज्ञानिक मोहिमेसाठी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर घेऊन जाणार आहे.

<><><><>

महाराष्ट्राबरोबर सहकार्य वाढवण्याबाबत पोर्तुगाल उत्सुक असल्याचं पोर्तुगालचे राजदूत जोओ मॅन्युएल मेंडिस रिबेरो डी अल्मेडा, यांनी सांगितलं मुंबईत आज राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांची भेट घेतल्यानंतर ते बोलत होते. भारताशी पर्यटन आणि व्यापारासह विविध क्षेत्रात सहकार्य वाढवणार असल्याचं त्यांनी सांगितलं. मुंबई दौऱ्यात आपण शंभराहून अधिक उद्योग प्रतिनिधींना भेटणार असल्याचंही राजदूतांनी सांगितलं. राज्यपालांनी यावेळी बोलताना, पोर्तुगाल आणि

भारतादरम्यानचा सध्याचा व्यापार १ अब्ज दोन कोटी डॉलर वरून किमान १० अब्ज डॉलर वाढवण्याबाबत प्रयत्न करावा, अशी सूचना केली.

<><><><>

मुंबईत पावसाळ्यात सखल भागात साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी महानगरपालिकेतर्फे आता फिरते उपसा संच वापरण्यात येणार आहेत. हे संच वाहनावर बसवण्यात आले असून त्यांची क्षमता ताशी अडीचशे घनमीटर पाणी उपसण्याची आहे. असे एकूण १० संच तैनात करण्यात आले आहेत.

<><><><>

मुंबईकरांना लवकरच एकाच तिकिटावर लोकल, बस, मेट्रो असा विविध माध्यमातून प्रवास करता येणार आहे. त्यासाठीच्या National Common Mobility Card चं अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयात आज केलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यावेळी उपस्थित होते. NPCI आणि स्टेट बँकेच्या सहकार्यानं मुंबई मेट्रो ३ नं हे कार्ड तयार केलं आहे.

<><><><>

नांदेड जिल्ह्यात सोमवारी रात्री झालेल्या जोरदार पावसामुळे अनेक भागात फळबागांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. या नुकसानाचे तातडीनं पंचनामे करावेत, अशी मागणी खासदार अशोक चव्हाण आणि भोकर मतदारसंघाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. या पावसामुळं झालेल्या नुकसानीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना माहिती दिल्याचं खासदार अशोक चव्हाण यांनी सांगितलं तर, या नुकसानीचे तातडीनं पंचनामे केले जातील, असं जिल्हा प्रशासनानं सांगितलं आहे.

<><><><>

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद-आयसीसीनं क्रिकेटपटू महेंद्रसिंह धोनीला आयसीसीच्या प्रतिष्ठेच्या हॉल ऑफ फेम मध्ये समाविष्ट केलं आहे. या वर्षी हा सन्मान मिळवणाऱ्या सात खेळाडूंमध्ये धोनीचा समावेश आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ११ वर्षांत भारताने लक्षणीय विकास आणि सुशासन अनुभवल्याचं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी केलं आहे. ते आज रालोआ सरकारच्या ११ वर्षांच्या पूर्ततेनिमित्त पुद्दुचेरी इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. जो देश भ्रष्टाचार आणि कमकुवत प्रशासनाच्या युगात अडकला होता, त्या देशाला पारदर्शक आणि लोककेंद्री प्रशासनाच्या युगात नेण्याची कामगिरी गेल्या ११ वर्षांत सरकारने केल्याचं ते म्हणाले. भारत आता जगातली चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला असून २७ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढण्यात आलं आहे. सरकारने महिला सबलीकरण, शेतकऱ्यांचं कल्याण आणि दारिद्र्य निर्मूलनाला प्राधान्य दिलं आहे. कलम ३७० रद्द केल्यानंतर जम्मू आणि काश्मीरमधला विकास, ऑपरेशन सिंदूरमध्ये स्वदेशी बनावटीच्या संरक्षण तंत्रज्ञानाचा यशस्वी वापर आणि नक्षलवादी कारवायांमध्ये झालेली लक्षणीय घट ही रालोआ सरकारची प्रमुख कामगिरी असल्याचंही मुरुगन यांनी नमूद केलं.

**//<><><><><>//**